# ठाणे जिल्ह्याला अंमली पदार्थांचा विळखा, ११ महिन्यात ८५९ आरोपींना अटक

**बंद रासायनिक कंपन्यांची पहाणी**

ठाणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात येणाऱ्या बंद रासायनिक कंपन्यांपैकी एकूण २७ बंद रासायनिक कंपन्यांची तपासणी अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांनी अन्न औषध प्रशासन, अधिकारी यांच्या मदतीने करण्यात आली आहे. तसेच इतरही रासायनिक कंपन्याची तपासणी करावी. जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारार्थ दाखल होणाऱ्या अंमली पदार्थ व्यसनग्रस्त रुग्णांकडून तेथील डॉक्टरांनी अंमली पदार्थाची विक्री व पुरवठाबाबत गोपनीय माहिती प्राप्त करून घेवून ती पोलिसांसोबत आदानप्रदान करावी. ठाणे शहर आयुक्तालय कार्यक्षेत्रात एकूण ०५ व्यसनमुक्ती केंद्र असून त्यापैकी ०५ व्यसनमुक्ती केंद्रांना अंमली पदार्थ विरोधी पथक येथील अधिकरी व अंमलदार यांनी भेटी दिलेल्या आहेत. या भेटीदरम्यान अंमली पदार्थ विक्रीबाबत, पुरवठ्याबाबत माहिती घ्यावी व कारवाई करण्याच्या सूचनाही यावेळी बैठकीत देण्यात आल्या. ठाणे शहर आयुक्तालयातील गायमुख कासारवडली, कोलशेत कापूरबावडी, कोपरी आणि दूगार्डी कल्याण येथील खाडी किनारी लक्ष ठेवावे अशा स्पष्ट सूचना यावेळी देण्यात आल्या.



**■ठाणे। प्रतिनिधी,**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जिल्हा असलेल्या ठाण्यात अंमली पदार्थांची खरेदी-विक्रि जोरात सुरु असल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. अंमली पदार्थांचा हा व्यवहार रोखण्यासाठी पोलिसांकडून वेळोवेळी मोहीम राबवली जात असल्याने गेल्या ११ महिन्यात ठाणे जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागांमधून चार कोटी एक लाख ९४ हजार रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. हा आकडा मोठा असला तरी प्रत्यक्षात याहून अधिक प्रमाणात या पदार्थांची तस्करी जिल्ह्यात सुरु असल्याचा संशय व्यक्त होतो आहे.

महाराष्ट्र शासनाने जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी समितीची स्थापना केलेली आहे. या समितीच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर अमली पदार्थांची खरेदी विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे. मागील अकरा महिन्यांच्या कालावधीत अमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई करत एकूण ४ कोटी १ लाख ९४ हजार ७१८ रुपये किंमत असलेले विविध अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. यात आतापर्यंत एकूण दाखल झालेल्या ७२३ गुन्ह्यांमध्ये एकूण ८५९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अंमली पदार्थ विरोधी समितीची नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय शिंदे यांनी ही माहिती दिली आहे. अमली पदार्थांच्या खरेदी- विक्रि, वाहतूक यासंबंधी करण्यात आलेल्या कारवाईचा आढावा घेण्याविषयीची बैठक नुकतीच ठाणे पोलीस आयुक्तालयात बैठक पार पडली. यावेळी अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी विविध उपायोजना करण्याच्या सूचना ठाणे शहर अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. पंजाबराव उगले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

०१ जानेवारी ते २८ नोव्हेंबर २०२३ मध्ये एनडीपीएस कायद्यान्वये गांजा हाताळल्याबाबत ४३ केसेस दाखल झाल्या असून १ कोटी २३ लक्ष ५४ हजार १९३ रुपये किंमतीचा ७४१ किलो ८७२ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. यामध्ये आतापर्यंत यासोबत ५३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. चरस हाताळल्याप्रकरणी ६ केसेस दाखल झाले असून ७२ लक्ष ७४ हजार रुपये किंमतीचा ८ किलो १८३ ग्रॅम चरस जप्त करण्यात आला आहे. आतापर्यंत यासोबत एकूण १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. कोकेन बाबतच्या २ केसेस दाखल झाले असून ५८ लक्ष ८० हजार रुपये किंमतीचा १४७ ग्रॅम कोकेन जप्त करण्यात आला आहे. आतापर्यंत यासोबत ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

मोफेड्रॉनबाबतच्या ३१ केसेस दाखल झाले असून ५४ लक्ष १९ हजार ८७० रुपये किंमतीचा १ किलो ८२० ग्रॅम ६ मि.ग्रॅ. मेफेड्रॉन जप्त करण्यात आला आहे. आतापर्यंत यासोबत एकूण ५० आरोपींना अटक करण्यात आली आहे. एलएसडी पेपर बाबतच्या १ लक्ष २० हजार रुपये किंमतीचा - २२ ग्रॅम वजनाचे एल.एस.डी १५ नग जप्त करण्यात आला आहे. इतर गोळ्या व सिरपबाबत ११ केसेस दाखल झाले असून ३५ लक्ष ८१ हजार ६९० रुपये किंमतीच्या १३ हजार ३५९ कफसिरप बॉटल व ५०० गोळ्या जप्त करण्यात आल्या आहे. आतापर्यंत यासोबत एकूण २४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. हेरॉईनबाबत १ केस दाखल झाले असून ६५ हजार रुपये किंमतीचे १३ ग्रॅम हेरॉईन जप्त करण्यात आले आहे. आतापर्यंत यासोबत एकूण १ आरोपीस अटक करण्यात आली आहे. तर सेवनार्थीच्या ६२९ केसेस दाखल करण्यात आल्या असून ७११ आरोपीस अटक करण्यात आली आहे. अशा प्रकारे एकूण ४ कोटी १ लाख ९४ हजार ७१८ रुपये किंमत असलेले विविध अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

## नेरुळ, सारसोळे गावात दुर्गंधीयुक्त गढूळ पाण्याच्या तक्रारी



**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

नेरुळ, सारसोळे विभागांत गढूळव दुर्गंधीयुक्त पाण्याच्या तक्रारी येत आहेत. पालिका प्रशासनाने मात्र सारसोळे विभागात पाणीपुरवठा योग्य पद्धतीने होत असल्याचा दावा केला आहे. सारसोळे गावात गढूळ व दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याच्या तक्रारी १६ डिसेंबरपासून येत आहे. याबाबत सारसोळे येथील ग्रामस्थ महिलांनी याबाबत तक्रार करत नळाला गढूळ पाणी येत असून पाण्याला घाण वासही येत असल्याचे सांगितले. नळाला येणारे गढूळ पाणी प्यायचे तरी कसे असा प्रश्न उपस्थित होत आहे. सारसोळे येथील पाण्याबाबतची एकाच घराची तक्रार प्राप्त झाली होती. त्या ठिकाणी तत्काळ तक्रार सोडवून पाईप बदलण्यात आला आहे. अधिक माहिती घेण्यात येईल, असे महापालिकेचे शहर अभियंता संजय देसाई यांनी सांगितले.

## पनवेल महापालिका क्षेत्रातील पहिला कोरोनाबाधित खारघरमध्ये



कोरोनाबाधित पहिला रुग्ण पनवेल महापालिकेच्या आरोग्य विभागाला आढळल्यानंतर राज्य सरकारच्या सूचनेप्रमाणे महापालिका आयुक्तांनी आरोग्य यंत्रणेची झाडाझडती घेऊन सर्व आरोग्यसेवकांसह पालिका प्रशासनाला कोरोना विरोधातील सामन्यासाठी सज्ज राहण्याची सूचना केली आहे. महापालिकेकडे असणाऱ्या प्राणवायूच्या क्षमतेसह पुरेसा औषधसाठा तसेच सरकारी उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णखाटा आणि पनवेल पालिका परिसरातील खाजगी रुग्णालयामध्ये रुग्णखाटांचा आढावा घेतला आहे.

**■पनवेल। प्रतिनिधी,**

पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये पहिला कोरोनाबाधित खारघर वसाहतीमध्ये गुरुवारी आढळला असून महापालिकेच्या नागरी आरोग्य वर्धिनीतून संबंधित बाधिताने बाह्य रुग्णसेवेतून उपचार घेतल्यावर त्यास साथरोगाचा संसर्ग झाल्याचे उजेडात आले. शुक्रवारी महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सूचनेनंतर हा बाधित त्याच्या घरात गृहविलगीकरणात राहिला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

खारघर वसाहतीमधील सेक्टर १६ येथील वास्तुविहार या इमारतीमध्ये राहणाऱ्या ३३ वर्षीय व्यक्तीला कोरोनाची बाधा झाल्याची माहिती पालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली. तसेच कळंबोली वसाहतीमध्ये शुक्रवारी स्वाईन फ्ल्यूचा रुग्ण पालिकेच्या आरोग्य विभागाला आढळला आहे. साथीचे आजार वाढल्याने रहिवाशांनी गर्दीच्या ठिकाणी जाण्यापूर्वी मुखपट्टीचा वापर करावा, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी केले.

पनवेल महापालिकेचे आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्याबरोबर महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या झालेल्या बैठकीमध्ये पनवेल महापालिका क्षेत्रात १२९१ रुग्णखाटा कोरोनासाठी उपलब्ध आहेत. प्राणवायू असलेल्या ७८९ रुग्णखाटा, अतिदक्षता विभागात २५८ रुग्णखाटा, वेंटीलेटर रुग्णखाटा ९४ आणि प्राणवायू नसलेल्या २४४ खाटा उपलब्ध आहेत.

## घोडबंदर मार्ग लवकरच अधिक रुंद



**■ठाणे। प्रतिनिधी,**

मेट्रो मार्गिका, उड्डाणपुलांची कामे यामुळे काही वर्षांपासून सर्वाधिक कोंडीचा ठरलेल्या ठाण्यातील कापूरबावडी ते गायमुख पर्यंतचा घोडबंदर मार्ग आणखी रुंद आणि खड्डेमुक्त करण्याचा महत्त्वकांक्षी प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) आखला आहे. घोडबंदर मार्ग नियोजित मेट्रो मार्गिकांच्या खांबांमुळे अरुंद झाला आहे. या मार्गाच्या दोन्ही बाजूस मोठ्या संख्येने नागरी संकुलांची उभारणी सुरू असून एक प्रकारे विस्तारित ठाणे येथे उभे रहात आहे. हे लक्षात घेऊन घोडबंदर मार्गाच्या दोन्ही बाजूस समांतर असणाऱ्या सेवा रस्त्यांचे मूळ मार्गात एकत्रिकरण करून चार-चार अशा एकूण आठ मार्गिकांचे पूर्णपणे काँक्रीटीकरण केले जाणार आहे.

## म्हणे, पनवेलची हवा छानच! तक्रारींवर उपाययोजना सुरु असल्याचे एमपीसीबीचे उत्तर



**■पनवेल। प्रतिनिधी,**

तळोजा एमआयडीसी परिसरातील कळंबोली, खारघर, तळोजा आदी वसाहतींमध्ये प्रदूषणाच्या तक्रारी येत आहेत, यावर वेगवेगळ्या प्रकारच्या उपाययोजना सुरू असल्याची माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून देण्यात आली. पनवेलच्या प्रदूषणाबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे दूषित वायू सोडणाऱ्या कारखान्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यावर प्रदूषणाच्या तक्रारी आणि उपाययोजनांची माहिती देऊन एमपीसीबीने प्रदूषणामुळे फार गंभीर प्रश्न निर्माण न झाल्याचे अप्रत्यक्ष नमूद केले आहे. तळोजातील वेगवेगळ्या कंपन्यांमधून रात्री, पहाटे दूषित वायू सोडला जातो. त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. वारंवार निदर्शनास आणूनही सरकारच्या अक्षम्य होणाऱ्या दुर्लक्षामुळे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून ठोस कारवाई होत नाही. त्यामुळे औद्योगिक वसाहतीतील संबंधित रासायनिक कारखान्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्षवेधीत केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयाकडून या लक्षेवधीवर उत्तर देण्यात आले. वायू आणि जलप्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक यंत्रणा उद्योगांनी बसवले आहे की नाही, याची तपासणी नियमितपणे केली जाते. यंत्रणा नसल्यास किंवा बंद असल्यास कायदेशीर कारवाई केली जाते. तक्रारी आल्यास रात्रीच्या वेळी गस्त घालून उद्योगांची तपासणी करून दोषी आढळल्यास कारवाई केली जाते.

## नैनामध्ये पाऊल ठेवू देणार नाही?

### अतिक्रमण मोहीम पथक माघारी, १०० पेक्षा अधिक लोकांवर गुन्हे

**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

सिडकोच्या अतिक्रमण पथकाला येऊ न देण्यासाठी थेट जेसीबी लावून रस्ता अडवणाऱ्या शंभरपेक्षा अधिक लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मौजे विचुंबे, ता. पनवेल, जि. रायगड येथील नैना अधिसुचित क्षेत्रात गट क. २३५ या ठिकाणी बांधलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासाठी सिडको अतिक्रमण पथक गेले असता हा प्रकार घडला.


संतप्त जमाव तसेच सिडको अतिक्रमण पथकाच्या विरोधातील रोष पाहून कायदा सुव्यवस्था बिघडू नये म्हणून मोहीम स्थगित करावी लागली. सिडको अतिक्रमण मोहिमेला विरोध करणाऱ्या विरोधात एवढ्या मोठ्या प्रमाणात पहिल्यांदाच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बळीराम पाटील, राजेश केणी, शेखर शेळके, वासुदेव भिंगारकर, वामन शेळके, सुभाष भोपी व इतर अंदाजे १०० व्यक्तींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरुवारी सकाळी बाराच्या सुमारास सिडकोचे अतिक्रमण विरोधी पथक हे पोलीस बंदोबस्तासह मौजे विचुंबे, ता. पनवेल, जि. रायगड येथील नैना अधिसुचित क्षेत्रात पोहोचले. येथील गट क. २३५ या बळीराम पाटील व इतर यांच्या मालकीच्या जमिनीवर विकासक अच्छेलाल यादव, रमेश वाघमारे यांनी अंदाजे १ हजार चौरस मीटर या क्षेत्रावरील बांधकाम केले होते. हे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याची मोहीम राबवण्यासाठी सिडकोने गुरुवारी प्रचंड पोलीस फौजफाटा नेला होता. मात्र विचुंबे



गावाकडे जाणाऱ्या पुलावर राजेश केणी (रा सुकापुर ता. पनवेल,) शेखर शेळके (रा आदई ता. पनवेल,) बळीराम पाटील (रा. विचुंबे ता. पनवेल,) वासुदेव भिंगारकर (रा. विचुंबे ता. पनवेल,) वामन शेळके (रा. मोहपाली, ता. पनवेल,) सुभाष भोपी (रा. रिटघर दुंद्रे, ता. पनवेल) यांच्यासह अंदाजे १०० लोकांचा जमाव जमला होता.

या जमावाने सिडको पथकाचा रस्ता जेसीबी आडवा लावून अडवला. त्यावेळी सिडको पथकातील अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला असता, आम्ही तुम्हाला नैनामध्ये पाय ठेवू देणार नाही, पुढे जाऊ देणार नाही. आमचे जेसीबी येथे आहे, अशी धमकी दिली. तसेच मागच्या आठवड्यात तुमच्या अधिकाऱ्यांना हरिग्राम येथून आम्ही हाकलून दिले आहे. नैनामध्ये पाय ठेवाल तर ठार मारू, अशी धमकी दिली आहे. जमावाने तुमच्या जिवाचे बरेवाईट केले तर त्याची जाणीव ठेवा असे म्हणून आक्रमकपणे बोलू लागले. तुम्ही हे बांधकाम कसे तोडता हे आम्ही बघतो, असे म्हणून जीविताला धक्का पोहोचवण्याची धमकी दिली.

## उरणमध्ये नववर्षानिमित्त चोख बंदोबस्त



**■उरण। प्रतिनिधी,**

सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी तरुणाई सज्ज झाली असून उरणच्या पिरवाडी किनाऱ्यावरील हॉटेल तसेच उरण परिसरातील फार्महाऊस फुल्ल झाली आहेत. उरण परिसरात समुद्रकिनारा असला तरी किनाऱ्यावर राहण्याची सोय मर्यादित होती. नव्याने तयार झालेल्या हॉटेलामध्ये ही सुविधा उपलब्ध असून ही हॉटेल नववर्षाच्या स्वागतासाठी सज्ज झाली आहेत. स्वागतासाठी पोलिसांनी सतर्कतेचा इशारा दिला आहे. त्यासाठी पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

तरुणाईला थर्टी फर्स्ट साजरा करण्याचे वेध लागले आहे. त्यासाठी अनेक नियोजन आराखडे तयार करण्यात आले आहेत. हा आनंद साजरा करण्यासाठी तरुणाईत अनेक मनसुबे आखले जात आहेत. पाट्यासाठी ढाबे, फार्म हाऊस, हॉटेल बुकिंग करण्यासाठी तरुणाईत चांगलीच चढाओढ लागली आहे. दरम्यान नववर्षाचे स्वागत करताना अतिरेक होणार नाही याची नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन न्हावा-शेवा बंदर विभागाचे सहायक पोलीस आयुक्त धनाजी क्षीरसागर यांनी केले आहे.

मद्याप्राशन करून रस्त्याने गोंगाट करणे, नशेत वाहन चालवणे आदी बाबी टाळण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. पिरवाडी, माणकेश्वर समुद्रकिनाऱ्यावर आणि सागरी परिसरातही चोख बंदोबस्तासाठी बीट मार्शल आणि ठिकठिकाणी पोलिसांची गस्ती पथके तैनात करण्यात आली आहेत. सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करताना आयोजित कार्यक्र मासाठी पोलिसांकडून आवश्यक त्या परवानग्या घ्याव्या, असे आवाहनही उरण पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## एसटीतही ई-पेमेंटला पसंती

### ठाणे विभागाला १.५ महिन्यात ९ लाखांपेक्षा अधिक उत्पन्न



**प्रवाशांचा वाढता प्रतिसाद :** ठाणे विभागात १ ते १० नोव्हेंबर या कालावधीत डिजिटल पेमेंटच्या माध्यमातून ८० हजार ८१५ रुपये, ११ ते २० नोव्हेंबरदरम्यान ५८ हजार ५०५ रुपये, २१ ते ३० नोव्हेंबरदरम्यान १० हजार ८० रुपये, १ ते १० डिसेंबर दरम्यान १ लाख ६९ हजार ७६५ रुपये आणि ११ ते १८ डिसेंबरदरम्यान पाच लाख ८७ हजार ५२० रुपयांचे उत्पन्न एसटीला प्राप्त झाले आहे. हळूहळू डिजिटल पेमेंटला प्रवाशांचा प्रतिसाद वाढत असल्याचे एसटीच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

**■ठाणे। प्रतिनिधी,**

उशिरा का होईना एसटी महामंडळाने प्रवाशांसाठी डिजिटल पेमेंटच्या माध्यमातून तिकीट काढण्याची सोय उपलब्ध केल्याने प्रवासात सुट्ट्या पैशांची चिंता दूर झाली आहे. शिवाय, एसटीच्या उत्पन्नामध्ये भर पडत आहे. प्रायोगिक तत्त्वावर १ नोव्हेंबरपासूनच डिजिटल पेमेंटचा वापर करण्यास सुरुवात झाली होती. या माध्यमातून एसटीच्या ठाणे विभागाला गेल्या दीड महिन्यात नऊ लाखांपेक्षा जास्त रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे.

आजघडीला डिजिटल पेमेंटच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर पैशांचे व्यवहार होत असून एखादी छोटी वस्तू खरेदी केली तरी नागरिक ऑनलाइनद्वारे पैसे देतात. डिजिटलमुळे रोखीने व्यवहार करणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. हीच गोष्ट लक्षात घेऊन एसटी महामंडळाने एक पाऊल पुढे टाकत डिजिटल प्रणालीद्वारे तिकीट खरेदी करण्याची सोय प्रवाशांसाठी उपलब्ध करून दिली. अनेकदा सुट्ट्या पैशांवरून वाहक आणि प्रवाशांमध्ये वाद होतात. मात्र डिजिटल पेमेंटमुळे वाद होणार नाहीत. तसेच, सुट्ट्या पैशांची चिंताही प्रवाशांना राहणार नसून डिजिटल प्रणालीद्वारे प्रवाशांना तिकीट खरेदी करता येईल, यासाठी अँड्रॉइड तिकीट इश्यू मशिन्स एसटीच्या सेवेत आल्या आहेत. या मशिनमुळे प्रवासी रोख पैशांऐवजी यूपीआय, क्यूआर कोडचा वापर करून तिकीट काढत आहेत. प्रायोगिक तत्त्वावर १ नोव्हेंबरपासूनच एसटीमध्ये डिजिटल पेमेंट सुविधेचा वापर करण्यास सुरुवात झाली होती. तेव्हापासून १८ नोव्हेंबरपर्यंत दीड महिन्यात एसटीच्या ठाणे विभागाला डिजिटल प्रणालीद्वारे झालेल्या तिकीटविक्रीतून नऊ लाख सहा हजार ६८५ रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. एसटीच्या ठाणे विभागातील आठ आगारापैकी सर्वाधिक जास्त ६ लाख ३५ हजार ९५० रुपये इतके उत्पन्न ठाणे १ आगाराला मिळाले आहे. ठाणे २ आगाराला २ लाख ७ हजार ६४५ रुपये, भिवंडी आगाराला १० हजार ४०, शहापूर आगाराला १ हजार ७८५, कल्याण आगार ८ हजार ८८०, मुरबाड १४ हजार ७७०, विठ्ठलवाडी १७ हजार ९५० आणि वाडा आगाराला ९ हजार ६६५ रुपये इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे.

## नोव्हेंबर महिन्यातील सर्वोत्कृष्ट तपास पुरस्कार प्रदान

### ५ पोलीस अधिकाऱ्यांचा आयुक्तांकडून गौरव



**■वसई। प्रतिनिधी,**

दर महिन्यात सर्वोत्कृष्टतपास करणाया पोलीस अधिकायाला पोलीस आयुक्तांकडून गौरविण्यात आले. नोव्हेंबर महिन्यात ५ पोलीस अधिकायांची निवड करण्यात आली. नायगावमधील लवेश माळी या तरुणाच्या हत्याप्रकरणाचा तपास केल्याबद्दल गुन्हे शाखा-२ चे शाहूराज रणावरे यांना सर्वोत्कृष्ट तपासाचा पुरस्कार देण्यात आला. एका व्यार्पायाच्या अपहरणाचा गुन्हा उघडकीस आणल्याबद्दल काशिमीरा पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक संदीप कदम यांना गौरविण्यात आले. ५५ लाखांचे अमली पदार्थ जप्त केल्याप्रकरणी तुळींज पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांना सर्वोत्कृष्ट तपासाबद्दल गौरविण्यात आले. गॅस सिलेंडर चोरी करून विकणाऱ्या टोळीला अटक करून मोबाईल आणि गॅस सिलेंडर चोरीचे ६ गुन्हे मध्यवर्ती गुन्हे शाखेने उघडकीस आणले होते. याबाबत राहुलकुमार राख यांना सर्वोत्कृष्ट पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## बेकायदेशीर जाहिरातबाजीला लगाम घालण्यासाठी वसई विरार महापालिकेची क्यूआर कोड प्रणाली कार्यान्वित



**धोकादायक फलकबाजी सुरूच :** वसई विरार शहरात विविध संस्थेच्या जाहिराती, राजकीय पक्षाचे फलक, वाढदिवस फलक हे कोणत्याही प्रकारची परवानगी घेताच लावले जातात. अनेकदा हे फलक कार्यक्रम संपला तरी सुद्धा वर्षानुवर्षे तसेच असतात. तर काही वेळा रस्त्यालगत व दुभाजकांच्या खांबाला लटकत असतात यामुळे अपघात होण्याची शक्यता असते. या धोकादायक जाहिरात फलकांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

**■वसई। प्रतिनिधी,**

अनधिकृतपणे शहरात उभारल्या जाणाऱ्या जाहिरात बाजीला लगाम घालण्यासाठी पालिकेने जाहिरात फलक व्यवस्थापन संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली आहे. याद्वारे आता प्रत्येक जाहिरात फलकावर क्विक रिस्पॉन्ड कोड (क्यूआर) लावला जाणार आहे. वसई-विरार महापालिकेने स्वतः जाहिरात फलक व्यवस्थापन केले जात आहे. जाहिरात फलक लावण्याची परवानगी देऊन त्यातून जाहिरात कर पालिकेला मिळू लागला आहे.

असे जरी असले तरी शहरात अनेक ठिकाणी बेकायदा व नियमबाह्य जाहिरात फलक लावले जातात यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत असते. तर दुसरीकडे पालिकेचे कर स्वरूपात मिळणारे उत्पन्न बुडते. तसेच काही वेळा जाहिरात फलक उभारताना पालिका परवानगी दिली जाते. त्यावर पालिकेचा आवक जावक क्रमांक असणे क्रमप्राप्त असताना काही वेळा तो नसतो त्यामुळे जाहिरात दाराने याची परवानगी घेतली किंवा नाही याची माहिती मिळत नाही. तर काहीजण याचाच गैरफायदा घेत धोकादायक पध्दतीने सुद्धा जाहिरात फलक उभे करतात. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असते. असे प्रकार टाळण्यासाठी जाहिरात धोरण निश्चित करण्याची गरज असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने ही स्पष्ट केले होते.

याच पार्श्वभूमीवर आता जाहिरात फलकांची परवानगी घेतली आहे किंवा कधी पर्यंत त्याची परवानगी आहे याची माहिती जनतेला कळावी यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, शहरात लागणाऱ्या जाहिरात फलकावर क्विक रिस्पॉन्ड कोड व जाहिरात फलक व्यवस्थापन संगणक प्रणाली विकसित करण्याचा निर्णय वसई-विरार महापालिकेने घेतलेला आहे.

याकरता मे. ऑरनेट टेक्नोलॉजिस प्रा. लि. या एजन्सीची नियुक्त केली आहे. प्रणाली विकसित करणे व तिच्या देखभाल दुरुस्तीसाठी सुमारे साडे नऊ लाख रुपये इतका निधी खर्च केला जाणार आहे अशी माहिती पालिकेने दिली आहे. या जाहिरात व्यवस्थापनामुळे बेकायदेशीर पणे उभ्या केलेल्या जाहिरात बाजीवर नियंत्रण मिळविण्यास मोठी मदत होणार आहे.

**ऑनलाइन सुविधा अशी...**

जाहिरात फलक व्यवस्थापन संगणकीय प्रणाली विकसित झाल्याने आता जाहिरात फलकावर क्यूआरकोड लावला जाणार आहे. याशिवाय जाहिरात कर जमा करण्यासाठी ऑनलाईन पेमेंट गेटवे सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जाहिरात विभागाच्या दैनंदिन कामकाजाचे व्यवस्थापन, परवानगी अर्ज करण्याची सुविधा, परवानगी देताना क्यूआर कोड जनरेट करणे, जाहिरात शुल्क व इतर भरणा अशी सर्व सुविधा यामुळे उपलब्ध होणार आहे. लवकर ही प्रणाली अंमलात आणली जाईल असे माहिती पालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागातून देण्यात आली आहे.

## कल्याणमध्ये भटक्या श्वानाची दगडाने ठेचून हत्या

### घटना मोबाइल कॅमेऱ्यात कैद

**■कल्याण। प्रतिनिधी,**

भटक्या कुत्र्याच्या डोक्यात दगड घालून त्याला जबर जखमी केल्याची घटना कल्याण पूर्वेकडील पिसवली परिसरात घडली. ही घटना मोबाइल कॅमेऱ्यात कैद करण्यात आली आहे. काही नागरिकांनी त्याला विरोध केला, मात्र तरीही त्याने हे कृत्य केले. या हल्ल्यात जखमी झालेल्या श्वानाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी ओम प्रकाश सिंह याच्या विरोधात मानपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. कल्याण पूर्व येथील मलंग रोड पिसवली परिसरात नाल्याजवळ बसलेल्या एका मादी जातीच्या भटक्या श्वानाच्या डोक्यात ओम प्रकाशने दगड घालून त्याला जबर जखमी केले.

मारहाणीमुळे श्वान वेदनेने विव्हळत होती. ही संपूर्ण घटना मोबाइल कॅमेरात कैद झाली असून हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. यात ओम प्रकाशला आजूबाजूचे नागरिक हे कृत्य करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत, मात्र कोणाचेही न ऐकता ओमप्रकाश याने दोन मोठे दगड या कुत्र्याच्या डोक्यात घालून त्या मादी श्वानाला जबर जखमी केलेले दिसत आहे. प्राणिमित्रांनी या जखमी श्वानाला उपचारासाठी रुग्णालयात नेले, मात्र या श्वानाचा मृत्यू झाला.

याप्रकरणी 'अलाईज फॉर ॲनिमल फाऊंडेशन'च्या सोनाली वाघमारे यांनी तात्काळ मानपाडा पोलिस ठाण्यात धाव घेत प्राणिमित्रांच्या मदतीने या श्वानाचा मृतदेह पोलिस ठाण्यात आणला. या निर्दयी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. मानपाडा पोलिसांनी या गंभीर घटनेची दखल घेऊन ओमप्रकाशविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.


## ढिसाळ वाहतूक नियोजनाने मनस्ताप



**■नवी मुंबई।प्रतिनिधी,**

ठाणे-बेलापूर मार्गावर घणसोली रेल्वेस्थानकासमोरील पुलावर ठाण्याकडून बेलापूरच्या दिशेने असलेली मार्गिका कॉंक्रीटीकरणासाठी पूर्ण बंद झाली आहे. परिणामी घणसोली स्थानकाजवळील बेलापूरच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर दिवसरात्र वाहतूक कोंडी होत आहे. त्याचबरोबर घणसोली पुलाखालील मार्गही वाहतूक विभागाने बंद केल्याने दररोज घणसोली स्थानकात उतरून महापे एमआयडीसी, एल ॲण्ट टी इन्फोटेक तसेच शीळफाट्याकडे कामानिमित्त जाणाऱ्या नोकरदार वर्गाला मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. सकाळी आणि संध्याकाळी वाहतूक कोंडी तर रात्री जडअवजड वाहनांचे मोठ्या प्रमाणात वर्दळ वाढली आहे. या ठिकाणी वाहतूक पोलिसांची कमतरता असल्याचे दिसून येत असल्याने वाहतूक कोंडी सुटतासुटत नसल्याचे दृश्य आहे. वाहतूक विभागाच्या ढिसाळ नियोजनाचा फटका या ठिकाणी बसत आहे.

## कल्याणमध्ये वकिलाच्या शाळकरी मुलाचे अपहरण



**■कल्याण। प्रतिनिधी,**

येथील आधारवाडी भागात राहत असलेल्या एका वकील महिलेच्या अल्पवयीन शाळकरी मुलाचे बुधवारी सकाळी अज्ञात इसमांनी अपहरण केले. कल्याण परिसरात शोध घेऊनही मुलाचा शोध न लागल्याने त्याच्या कुटुंबीयांनी खडकपाडा पोलीस ठाण्यात या अपहरण प्रकरणी तक्रार केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पोलिसांनी सांगितले, कल्याण पश्चिमेतील आधारवाडी भागातील चाणाक्य नगर भागात ॲडव्होकेट हिमनील महेश पवार राहतात. त्यांचा १५ वर्षाचा मुलगा कल्याण मधील एका शाळेत शिक्षणासाठी सायकलवरून जातो. बुधवारी सकाळी साडे नऊ वाजता नेहमीप्रमाणे मुलाने आपल्या आईला मी शाळेत जात आहे, असे सांगून तो एकटाच सायकलवरून शाळेत जाण्यास निघाला. मुलगा नेहमीप्रमाणे शाळेत गेला असेल म्हणून पालक निश्चिंत होते. शाळा सुटल्यावर संध्याकाळी मुलगा घरी आला नाही म्हणून पालकांनी त्याचे मित्र, शाळेत चौकशी केली तेव्हा तो शाळेत नसल्याचे अपहृत मुलाच्या पालकांना समजल्यावर ते घाबरले. त्यांनी तात्काळ शाळा, कल्याण परिसरात मुलाचा शोध घेतला. तो आढळून आला नाही. मुलाचे अज्ञात इसमाने अपहरण केल्याचा संशय व्यक्त करून मुलाची आई ॲडव्होकेट हिमनील पवार यांनी खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सजेर्राव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक ए. एस. पवार या प्रकरणाचा तपास करत आहेत. पोलिसांनी विशेष तपास पथके तयार करून या प्रकरणाचा शोध सुरू केला आहे.

# कांदा निर्यात बंदीप्रश्नी वरिष्ठ नेते केंद्रीय नेत्यांना भेटणार, दादा भुसे यांची ग्वाही



■नाशिक। प्रतिनिधी,

कांदा निर्यात बंदीसंदर्भात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी केंद्राशी संवाद साधला आहे. याप्रश्नी राज्यातील वरिष्ठ नेते लवकरच केंद्रीय मंत्र्यांना भेटून कांद्यासह उसाचे दर यावर चर्चा करणार असल्याचे नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे यांनी सांगितले. निर्यात बंदीच्या निर्णयामुळे एका झटक्यात कांद्याचे दर निम्म्यावर आले. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्यामुळे स्थानिक पातळीवर पडसाद उमटले. निर्यात बंदीचा निर्णय मागे घ्यावा, या मागणीसाठी आंदोलने झाली. माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी चांदवड येथे रस्त्यावर उतरून निर्यात बंदीवरून सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले होते. राजकीय पटलावर हा विषय गाजत असताना राज्य सरकार केंद्राशी संपर्क साधून त्यावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे भुसे यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय मंत्र्यांशी संवाद साधला होता. अधिवेशन काळात प्रत्यक्ष दिल्लीला जाणे शक्य झाले नाही. आता राज्याचे प्रमुख नेते दिल्लीला जाऊन चर्चा करतील, असे भुसे यांनी सूचित केले. दरम्यान, मराठा आरक्षणासाठी राज्य सरकार आवश्यक ती प्रक्रिया करीत आहे. कायदे, नियमांच्या चौकटीत बसणारे आरक्षण दिले जाणार आहे. या प्रक्रियेसाठी मनोज जरांगे यांनी अधिक वेळ देण्याची गरज भुसे यांनी मांडली.

**रविवारी कांदा उत्पादकांची बैठक**

कांदा निर्यातबंदी, घसरणारे दर यावर आंदोलनाची रणनीती ठरवण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने रविवारी दुपारी एक वाजता लासलगाव बाजार समितीच्या आवारात कांदा उत्पादकांची बैठक बोलविण्यात आली आहे. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संदीप जगताप यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होईल. कांदा, द्राक्ष, पीक विमा आणि इतर स्थानिक प्रश्नांवर यावेळी चर्चा केली जाईल. आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी संघटनेच्या जिल्हा व सर्व तालुका पदाधिकारी आणि उत्पादकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे, स्वाभिमानी पक्षाचे अध्यक्ष राजू शिरसाठ, राज्य समन्वयक कुबेर जाधव आदींनी केले आहे.

# मालाडमधील शाळेत चार वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार



■मुंबई। प्रतिनिधी,

मालाड येथील इंग्रजी माध्यमाच्या शाळेत चार वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी मालवणी पोलिसांनी बुधवारी सुरक्षा रक्षकाला अटक केली. आरोपीविरोधात बलात्कार, विनयभंग व बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण (पोक्सो) कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीच्या कृत्यामुळे पीडित मुलीला इजा झाली असून तिच्यावर शताब्दी रुग्णालयात उपचार करण्यात आले. ५२ वर्षीय आरोपी पीडित मुलीला रिकाम्या वर्गात घेऊन गेला. त्यानंतर तिला बोलण्यात गुंतवणूक तिचे डोळे बंद करून अश्लील चाळे केले. त्यानंतर मुलीला जखमी केली. त्याबाबत पीडित मुलीच्या आईला समजल्यानंतर तिने डॉक्टरांकडे नेले. त्यावेळी हा प्रकार समजला. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईच्या तक्रारीवरून मालवणी पोलिसांनी बलात्कार, विनयभंग व पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलिसांनी मालाड येथील राहत्या घरातून आरोपीला अटक केली. आरोपीने इतर मुलींनाही असा त्रास दिला आहे का याचा मालवणी पोलीस तपास करीत आहेत.

# कंत्राटी चालकाकडून आयुक्तांचा पाठलाग

**नोटीस बजावली**

धर्मेंद्र सोनावणे हा आयुक्तांचा पाठलाग का करत होता? हे अद्याप गुलदस्त्यात असून आयुक्त कोणत्या विभागात जातात, काय पाहणी करतात, हे काम त्याला कोणी सांगितले होते का, यांसारखे अनेक प्रश्न अनुत्तरित असून त्याच्या चौकशीत याचा उलगडा होण्याची शक्यता आहे. याप्रकरणी सोनावणेला नोटीस बजावण्यात आली आहे.

■डोंबिवली। प्रतिनिधी,

कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांचा प्रभागात पाहणी दौरा सुरू असताना त्यांच्या गाडीचा पाठलाग करणे एका कंत्राटी चालकास महागात पडले आहे. पालिका आयुक्त जाखड यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी गाडी थांबवून त्याची चौकशी करून त्याला जाब विचारला. तसेच संबंधित विभागास त्या चालकावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. ही माहिती सोशल मीडियावर व्हायरल झाली असून चालक धर्मेंद्र सोनावणे याची चौकशी करून त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे उपायुक्त अर्चना दिवे यांनी सांगितले.

महापालिकेच्या आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांचा गुरुवारी 'अ' प्रभागात पाहणी दौरा होता. केडीएमसीतील धर्मेंद्र सोनावणे असे कर्मचाऱ्याचे नाव आहे. पालिका आयुक्त इंदुराणी जाखड यांचा २१ डिसेंबरला केडीएमसीच्या ह्यअह्न प्रभाग कार्यालय क्षेत्रात पाहणी दौऱ्यादरम्यान आयुक्त जाखड यांच्या गाडीचा धर्मेंद्र सोनावणे हा कंत्राटी चालक दुचाकीने पाठलाग करत होता. ही बाब लक्षात येताच आयुक्तांनी त्याच्या गळ्यात असलेले ओळखपत्र पाहिले. गाडी रस्त्याच्या बाजूला उभी करून सोनावणे याची चौकशी करून त्याला जाखड यांनी जाब विचारला. तसेच, संबंधित विभागाला सोनावणे याच्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करणार असल्याचे उपायुक्तांनी सांगितले.

# कूपनलिका मोटारीला वीज जोडणीसाठी लाच, चोपडा तालुक्यात वरिष्ठ तंत्रज्ञाला अटक



■जळगाव। प्रतिनिधी,

शेतातील कूपनलिकेसाठी मोटारीच्या वीजजोडणीसाठी तीन हजारांची लाच स्वीकारताना धानोरा (ता. चोपडा) येथील वरिष्ठ तंत्रज्ञ हा जळगावच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाच्या जाळ्यात अडकला. शुक्रवारी दुपारी ही कारवाई करण्यात आली. अनिल राठोड (२८, लक्ष्मीनगर, धानोरा, चोपडा) असे या वरिष्ठ तंत्रज्ञाचे नाव आहे. जळगाव येथील ५० वर्षांच्या तक्रारदाराच्या पत्नीच्या नावाने देवगाव (ता. चोपडा) शिवारात शेत आहे. या शेतात थ्री फेजच्या कूपनलिका मोटारीसाठी तक्रारदारांनी वीजजोडणी घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज केला होता. त्यानंतर तक्रारदार हे वरिष्ठ तंत्रज्ञ अनिल राठोड यांना भेटले. त्यांनी या कामासाठी चार हजारांची लाच मागितली. तडजोडीअंती तीन हजार रुपये ठरले. तक्रारदारांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. पोलीस उपअधीक्षक सुहास देशमुख यांच्या नेतृत्वात पथकाने शुक्रवारी दुपारी सापळा रचत तक्रारदारांकडून वरिष्ठ तंत्रज्ञ राठोड यास तीन हजारांची लाच स्वीकारताच अटक केली.

# साप आणि अजगरांची तस्करी करणाऱ्याला अटक; नऊ अजगर व दोन सापांची सुटका - डीआरआयची कारवाई



■मुंबई। प्रतिनिधी,

महसूल गुप्तवार्ता संचलनालयाने (डीआरआय) मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावर केलेल्या कारवाईत अजगर व सापांच्या तस्करीप्रकरणी एकाला अटक करण्यात आली. आरोपीकडून नऊ अजगर, दोन साप जप्त करण्यात आले असून आरोपीविरोधात सीमाशुल्क व वन्यजीव संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संशयीत आरोपी वन्यजीवांची तस्करी करीत असल्याची माहिती डीआरआयला मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी त्याच्याकडील एका पाकीटाची तपासणी केली असता नऊ अजगर (पायथन रेगियस) आणि दोन साप (पॅन्थेरोफिस गट्टाटस) सापडले. सीमाशुल्क कायदा १९६२ अंतर्गत ते जप्त करण्यात आले.

वन्यजीव गुन्हे नियंत्रण विभाग, नवी मुंबईच्या अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर जप्त केलेल्या साप व अजगराची माहिती घेतली असता ते परदेशातील असल्याचे समजले. त्यामुळे आरोपींनी आयात धोरणाचे उल्लंघन केल्याचे निष्पन्न झाले. अजगर आणि साप पुन्हा बँकॉकला पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या सरपटणारे प्राणी विमान कंपनीच्या ताब्यात देण्यात आले असून विमान कंपनीच्या मदतीने पुन्हा बँकॉकला पाठवण्यात येणार आहेत. याप्रकरणी प्राणी घेऊन आलेल्या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे.

# कर्तव्यावरुन परतताना अनर्थ, लष्कराच्या वाहनाची धडक, अपघातात पोलीस अधिकाऱ्याचा मृत्यू




■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिक शहरातील देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक कुंदन सोनोने (वय ४३) यांचे अपघातात निधन झाले आहे. लष्करी वाहनाचा त्यांच्या दुचाकीला धक्का लागल्याने त्यांचा अपघाती मृत्यू झाला. त्यांच्या दुर्दैवी अपघाती निधनाने पोलीस दलासह सर्वत्र शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त केली जात आहे. याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, गुरुवारी (दि.२१) सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास सोनोने हे त्यांच्या सीबीझेड दुचाकीवरुन (एमएच१५-सीवाय ४०१४) देवळाली कॅम्पच्या लष्करी हद्द परिसरातील डेअरी फार्ममार्गे कर्तव्यावरून घरी जात होते. त्यांच्या दुचाकीला देवळाली कॅम्प परिसरातील वडनेर रोडजवळ असलेल्या लष्कराच्या पेट्रोल पंपाजवळ लष्कराच्या वाहनाचा धक्का लागला. धक्का लागल्याने देवळाली पोलीस स्थानकांत कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस अधिकारी कुंदन सोनोने यांचा अपघात झाला. यावेळी तात्काळ त्यांना लष्करी जवानांनी लष्कराच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचाराआधीच त्यांची प्राणज्योत मालवली. डॉक्टरांनी सोनोने यांना तपासून मयत घोषित केले. अपघातात सोनोने यांच्या छाती व पायाला गंभीर जखमा झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, देवळाली पोलीस स्थानकात कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक यांचं अपघातात दुर्दैवी निधन झाल्याने देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यासह नाशिक शहर पोलीस दलात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पाश्चात आई, भाऊ, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. अपघाताची माहिती समजताच पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, उपायुक्त मोनिका राऊत, सहायक पोलीस आयुक्त आनंदा वाघ, आदी अधिकाऱ्यांनी देवळाली कॅम्प येथील घटनास्थळी धाव घेत अपघाताची माहिती घेतली.

# पुणे विद्यापीठाच्या एमबीए अभ्यासक्रमाचा पेपर फुटला, 'या' विषयाची परीक्षा पुन्हा घेण्याचा निर्णय




■पुणे। प्रतिनिधी,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षेत आज एमबीए अभ्यासक्रमातील लीगल ॲस्पेक्ट ऑफ ऑफ बिझनेस या विषयाचा पेपर फुटल्याचे उघडकीस आले आहे. एका परीक्षा केंद्रातून प्रश्नपत्रिका प्रसारित झाल्याचे समाजमाध्यमाद्वारे दिसून आले असून, या विषयाची परीक्षा रद्द करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. आता या विषयाची परीक्षा २६ डिसेंबरला होणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी ही माहिती दिली.

विद्यापीठाच्या ऑक्टोबर २०२३ सत्राच्या परीक्षा २१ नोव्हेंबरपासून सुरळीतपणे सुरू आहेत. काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा या त्यांच्या सत्रपूर्तता कालावधीनुसार आयोजित केलेल्या आहेत. त्यात एमबीए अभ्यासक्रमाची परीक्षा ११ डिसेंबरपासून सुरु झालेल्या आहेत. आज (२२ डिसेंबर) प्रथम वर्ष एमबीए २०१९ रिव्हाईज, प्रथम सत्रातील १११- -लीगल ॲस्पेक्ट ऑफ ऑफ बिझनेस या विषयाची प्रश्नपत्रिका एका परीक्षा केंद्रामधून प्रसारित झाल्याचे काही समाजमाध्यमांव्दारे दिसून आलेले आहे. परीक्षांची संवेदनशीलता, गोपनीयता व पावित्र्य लक्षात घेता २२ डिसेंबर रोजीच्या प्रथम वर्ष एम.बी.ए. २०१९ रिव्हाईज प्रथम सत्रातील १११ लीगल ॲस्पेक्ट ऑफ ऑफ बिझनेस या विषयाची परीक्षा रद्द करण्यात येत आहे. या विषयाची परीक्षा २६ डिसेंबरला सकाळी १०.०० ते १२.३० या वेळेत आयोजित करण्यात येत आहे, असे स्पष्ट करण्यात आले.

**पानसरे हत्या प्रकरण :**

# फरारी आरोपींचा शोध घेण्याबाबत तपासात काहीच प्रगती नाही

■मुंबई। प्रतिनिधी,

कॉम्रेड गोविंद पानसरे हत्याप्रकरणाचा तपास करणाऱ्या राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) फरारी आरोपींचा शोध घेण्यासाठी उच्च न्यायालयाकडे बुधवारी आणखी मुदत देण्याची मागणी केली. परंतु, गेल्या चार महिन्यांत या आरोपींचा शोध घेण्याबाबत काहीच झालेले नाही, असे ताशेरे ओढून न्यायालयाने एटीएसच्या तपासावर बोट ठेवले.

पुढील तपासासाठी आणखी तीन महिन्यांची मुदत देण्याची मागणी एटीएसने सुनावणीच्या वेळी केली. परंतु, न्यायालयाने तपासाबाबत नाराजी व्यक्त केल्यानंतर एटीएसने एक महिना तरी मुदतवाढ द्यावी, अशी विनंती न्यायालयाला केली.

त्यावर, आतापर्यंत दिलेल्या मुदतीत फरारी आरोपींबाबत काहीच झालेले नाही, आता आणखी काय करणार, असा टोला न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठाने एटीएसला हाणला. मात्र, त्याचवेळी एटीएसला पुढील तपासासाठी दोन महिन्यांची मुदतवाढ दिली. प्रकरणातील दोन फरारी आरोपी सारंग अकोलकर आणि विनय पवार यांचा शोध अद्यापही सुरू आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेला टँकरमाफियांचा वेढा... कमी दाबाने पाणीपुरवठा करण्यासाठी अधिकाऱ्यांवर दबाव



■पिंपरी। प्रतिनिधी,

शहरातील पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव भागात टँकर लॉबीसाठी महापालिका अधिकाऱ्यांवर दबाव आणून कमी दाबाने पाणीपुरवठा करण्यास भाग पाडले जात असल्याचा तक्रारी येत आहेत. त्यामुळे गृहनिर्माण संस्थांना बाराही महिने खासगी टँकरने पाणी विकत घ्यावे लागत आहे. टँकर लॉबीला राजकीय वरदहस्त असल्याची चर्चा असून, टँकरने पाणी घ्यावे लागत असल्याने सभासदांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. पिंपरी-चिंचवड शहराची झपाट्याने वाढ होत आहे. मोठमोठ्या गृहनिर्माण संस्था विकसित होत आहेत. परिणामी, शहराची लोकसंख्या २७ लाखांवर गेली आहे.

पाण्याची गरज भागवण्यासाठी महापालिका प्रतिदिन पवना धरणातून ५१० दशलक्ष लिटर (एमएलडी), चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रातून ७० आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून १३ असे ५९३ दशलक्ष लिटर पाणी उचलते. यापैकी ४० टक्के पाणीगळती व चोरी होत असल्याचे प्रशासन गेल्या पाच वर्षांपासून सांगत आहे. मात्र, त्यावर ठोस उपाय अद्याप सापडत नाही, अशी स्थिती आहे. मागील चार वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. तोही अनियमित, अपुरा व कमी दाबाने होतो. गृहनिर्माण संस्थांमधील रहिवाशांना टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव भागात कुणाल आयकॉन, साई पर्ल यांसह अनेक मोठ्या गृहनिर्माण संस्था आहेत.

# दिव्यांग असूनही धूम स्टाईलने चोरी करणाऱ्या चोरांना माणगाव येथून अटक



■डोंबिवली । प्रतिनिधी,

मोटार सायकलवरुन धूम स्टाईलने येऊन पादचाऱ्यांना लक्ष करत चेन स्नॅचिंग करणाऱ्या दोन सराईत चोरट्यांना मानपाडा पोलिसांनी रायगड जिल्ह्यातील माणगाव येथून अटक केली आहे. विरु राजपूत (वय 23) आणि सुखविर रावल (वय 28) अशी अटक आरोपींची नावे असून विशेष बाब म्हणजे यातील सुखवीर हा दिव्यांग आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून 105 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व मोटार सायकला असा एकूण 7 लाख 22 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असल्याची माहिती सहाय्यक पोलिस आयुक्त कल्याणजी घेटे यांनी दिली. डोंबिवली पूर्वेतील पी ॲण्ड टी कॉलनी परिसरात राहणारे वसंताकुमारी नायर (वय 48) या त्यांची 16 वर्षीय मुलगी गौरी हीच्या सोबत पेंढरकर कॉलेज येथील रस्त्यावरुन पायी चालत जात होत्या. दुपारी अडीचच्या सुमारास दुचाकीवरुन आलेल्या दोघा चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील 72 हजार रुपये किंमतीचे मंगळसुत्र चोरुन पळ काढला होता. 17 डिसेंबरला ही चोरीची घटना घडली होती. याप्रकरणी 18 डिसेंबरला मानपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच वरिष्ठ पोलिस निरिक्षक अशोक होनमाने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरिक्षक अविनाश वनवे व त्यांच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचा शोध घेतला. दोघे आरोपी गुन्हा करुन मोटार सायकलवरुन माणगाव येथे गेल्याची बाब त्यात दिसून आली. पोलिसांनी माणगाव येथे सापळा रचून दोघांना 19 डिसेंबरला अटक केली. हे दोघे ही मुळचे मध्य प्रदेश येथील असून सध्या ते डोंबिवलीत दत्त नगर परिसरात राहतात.

आरोपींना ताब्यात घेत चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून 6 लाख 32 हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व 90 हजार रुपये किंमतीची मोटार सायकल असा एकूण 7 लाख 22 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# बाल गुन्हेगारीपासून परावृत्त होण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस देत आहेत फुटबॉलचे प्रशिक्षण



■पिंपरी। प्रतिनिधी,

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून बाल गुन्हेगारी डोकं वर काढत आहे. वाहनांची तोडफोड, मारामारी, यासह मोबाईल चोरीच्या गुन्ह्यांमध्येदेखील अल्पवयीन मुलांचा मोठा सहभाग आहे. मुलांना योग्य वेळी योग्य दिशा मिळावी म्हणून पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून गुन्हेगारीच्या दिशेने वळणाऱ्या आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या विधीसंघर्षित बालकांना फुटबॉल खेळण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. यासाठी संदेश बोर्डे हे शहरातील १८ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ४०० पेक्षा अधिक मुलांना फुटबॉल खेळण्याचे प्रशिक्षण देत आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी बाल गुन्हेगारीमध्ये सात ते आठ टक्क्यांनी घट झाली आहे, अशी माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांनी दिली. पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयात गेल्या अनेक वर्षांपासून बाल गुन्हेगारी ही पोलिसांसाठी आव्हानात्मक ठरलेली आहे. बाल गुन्हेगारी आटोक्यात आणण्यासाठी आता पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली 'दिशा' उपक्रम राबवला जात आहे. गेल्या काही महिन्यांपासून दिशा उपक्रमाच्या माध्यमातून अल्पवयीन मुलांना फुटबॉलचे प्रशिक्षण दिले जात आहे. शहरात ७८ झोपडपट्टी असून या ठिकाणी वावरत असलेल्या अठरा वर्षांखालील मुलांना हे फुटबॉलचे प्रशिक्षण दिले जात आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी, गुन्हेगारीच्या दिशेने वळणारे आणि चांगल्या मुलांचा या फुटबॉल प्रशिक्षणात सहभाग आहे.

# विरारमध्ये २० लाखांचे एमडी जप्त

■नालासोपारा। प्रतिनिधी,

विरार गुन्हे प्रकटीकरण पथकाने २० लाख रुपयांचे (एमडी) अमली पदार्थ जप्त केले असून दोघांना अटक केली आहे. त्यांच्यावर विरार पोलिस ठाण्यात 'एनडीपीएस' नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसई न्यायालयाने त्यांना आज (ता. २२) पोलिस कोठडी सुनावली.

मोहम्मद इशाक शेख (वय ३४), मोहम्मद मोईनीदुन शेख (वय २५, रा. दोघेही धारावी, मुंबई) अशी अमली पदार्थ तस्करांची नावे आहेत. विरार पूर्व मोहक सिटी परिसरात गुरुवारी अमली पदार्थ विक्रीसाठी आरोपी येणार असल्याची माहिती विरार गुन्हे प्रकटीकरण पथकाला मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी तात्काळ गुन्हे प्रकटीकरणचे पोलिस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर कोकाटे, पोलिस हवालदार सचिन लोखंडे, विशाल लोहार, संदीप शेरमाले, योगेश नागरे, पोलिस अंमलदार बालाजी गायकवाड, सचिन बलिद, प्रफुल सोनार यांचे पथक तयार केले. या पथकाच्या गस्तीदरम्यान बुलेटवरून आलेले संशयित व्यक्तींना पथकाने अडवले. त्यांच्या अंगझडतीत १९ लाख ४० हजार रुपये किमतीचा ९७ ग्रॅम एमडी हा अमली पदार्थ सापडला. त्यांच्याकडून एमडी आणि एक बुलेट असा २० लाख ९० हजार ६३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यांनी हे अमली पदार्थ कुठून आणले, त्यांची कुठे विक्री करणार होते, याचा तपास करण्यात येणार आहे, असे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी सांगितले.

# गोरेगावमध्ये तडीपार आरोपीचा पोलिसांवर हल्ला




■मुंबई। प्रतिनिधी,

तडीपार आरोपी गोरेगाव येथे गुरुवारी एका व्यक्तीला मारहाण करीत असल्याची माहिती मिळताच तात्काळ पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. मात्र आरोपीने पोलीस पथकावरही हल्ला केला. याप्रकरणी बांगूर नगर पोलिसांनी सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून २३ वर्षीय आरोपीला अटक केली. आरोपीविरोधात यापूर्वी चार गुन्हे दाखल असून त्याच्याविरोधात दोन वेळा प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. बांगूर नगर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस शिपाई संदीप झगडे गुरूवारी रात्री कर्तव्यावर होते. गोरेगावमधील भगतसिंह नगर येथे दोन व्यक्तींमध्ये हाणामारी सुरू असल्याचा संदेश नियंत्रण कक्षाकडून बांगूर नगर पोलीस ठाण्याला प्राप्त झाला. त्यानुसार झगडे व त्यांचे सहकारी घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी संशयीत आरोपी दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीला मारहाण करीत होता. त्याला समजावण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने पोलिसांवर हल्ला केला.

यावेळी आरोपीने पोलिसांना मारहाण केली, तसेच पोलीस पथकावर फरशीचा तुकडा फेकला. पोलीस पथकाने आरोपीला ताब्यात घेतले आणि पोलीस ठाण्यात आणले. त्यानंतर सरकारी कामात अडथळा निर्माण करणे व मारहाण केल्याप्रकरणी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी सराईत चोर आहे. त्याच्याविरोधात चार चोरीचे गुन्हे दाखल आहेत. तसेच एकदा त्याच्याकडून बंधपत्र लिहून घेण्यात आले आहे.

# नागपूर जिल्हा बँक घोटाळा प्रकरणी माजी मंत्री सुनील केदार यांना ५ वर्षाचा कठोर कारावास



■नागपूर। प्रतिनिधी,

काँग्रेसचे नागपूर जिल्ह्यातील दिग्गज नेते तथा माजी मंत्री सुनील केदार यांना नागपूर जिल्हा सहकारी बँक घोटाळा प्रकरणात न्यायालयाने दोषी ठरविले आहे. न्यायालयाने सुनील केदार यांना ५ वर्षाचा कठोर कारावास आणि १० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. सुनील केदार हे या प्रकरणात मुख्य आरोपी आहेत. २००१-०२ दरम्यान हा घोटाळा झाला तेव्हा केदार बँकेच्या अध्यक्षस्थानी होते. मुंबई, कोलकाता आणि अहमदाबाद येथील काही कंपन्यांनी बँकेच्या रकमेतून १२५ कोटी रुपयांचे सरकारी रोखे खरेदी केले होते. त्यानंतर या कंपन्यांनी सरकारी रोखे दिले नाही तसेच बँकेची रक्कमही परत केली नाही. दोषी ठरवलेल्या आरोपींमध्ये सुनील केदार, अशोक चौधरी, केतन शेठ, अमित वर्मा, सुबोध भंडारी, नंदकिशोर त्रिवेदी यांचा समावेश आहे. इतर दोन आरोपींपैकी रोखे दलाल संजय हरिराम अग्रवाल यांच्याविरुद्धच्या खटल्यावर मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे तर कानन वसंत मेवावाला फरार आहे.